# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक १२.०३.२०२६

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी पुन्हा एकदा गोवंश जनावरांची कत्तलीकरीता तस्करी/वाहतुक करणाऱ्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) अन्वये कारवाई केली

पोलीस स्टेशन भिवापुरः— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात भिवापुर पोलीसांनी अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकामी तस्करी करणाऱ्या टोळीचा प्रमुख तसेच सदस्य अशा एकुण ५ आरोपीतांच्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे. **अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकामी तस्करी करणाऱ्या टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये ही नागपुर ग्रामीण जिल्हयातील दुसरी कारवाई आहे. यापुर्वी सुध्दा महाराष्ट्र राज्यात पहील्यांदाच नागपुर ग्रामीण पोलीसांनी कळमेश्वर येथील अवैधरित्या गोवंश तस्करीच्या गुन्हयात १२ आरोपींच्या टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये कारवाई केली आहे.**

दिनांक ०५/०२/२०२६ रोजी भिवापुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद आहे. त्याची हकीकत याप्रमाणे आहे की, टाटा कंपनीचे झेनॉन पिकअप वाहन क्र एम.एच. ३४ ए.बी. ६९६४ चा चालक नामे श्रीकांत उर्फ छोटू यादवराव चौधरी, वय २९ वर्षे, रा. नागतरोली ता. भिवापूर याने ०८ गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला पायाला आखुड दोरखंडाने निर्दयतेने बांधुन त्याच्या वाहनाच्या डाल्यामध्ये कोंबुन कत्तलीकरिता अवैधरित्या जाणीवपुर्वक वाहतुक करत असताना भरधाव वेगाने व निष्काळजीपणे बेदरकारपणे त्याच्या ताब्यातील वाहन चालवुन राष्ट्रीय महामार्ग क्रं. ३५३ ड वरील मानोरा शिवार येथील भिवापूर ते उमरेड कडे जाणाऱ्या रोडच्या कडेला असलेल्या मोठया झाडाला जबर

धडक देवुन अपघात केला होता. वाहनाच्या डाल्यामध्ये कोंबुन असलेल्या एकुण ०८ जनावरांपैकी ५ जनावरे जखमी झाले होते तर ३ जनावरे मयत झाले होते. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन भिवापूर अप.क्र. ७८/२६ कलम ३२५, २८१(१) भा.न्या.सं. सहकलम ११(१), (ड), (ई) (फ) प्राणी छळ प्रति.अधि.सहकलम ५,९ महा.पशुसंरक्षण अधि . सहकलम ११८ म.पो.का. अन्वये **गुन्हा नोंद करून सदर गुन्हयात आरोपी क्रं १) श्रीकांत यादवराव चौधरी,वय २७ वर्ष,रा.नागतरोली ता. भिवापूर आणि क्रं २) प्रफुल उर्फ भोला हेमराज चौधरी, वय २३ वर्ष, रा. नागतरोली ता. भिवापूर, जि. नागपूर आरोपींना अटक करण्यात आली .**

**भिवापुर पोलीसांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास केला असता असे निदर्शनास आले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला असुन सदर टोळीमध्ये आरोपी क्रं. १) टोळी प्रमुख — श्रीकांत यादवराव चौधरी,वय २७ वर्ष,रा.नागतरोली ता. भिवापूर आणि टोळी सदस्य — आरोपी २) प्रफुल उर्फ भोला हेमराज चौधरी,वय २३ वर्ष, रा. नागतरोली ता. भिवापूर जि. नागपूर याच्यासह अजुन तीन आरोपी आहेत.** टोळी प्रमुख आणि टोळी सदस्य हे अवैधरित्या जनावरांची वाहतुक करण्यासाठी वेगवेगळे वाहन वापरतात, टोळीतील काही सदस्य जनावरांचा पुरवठा करतात, काही वाहतुक तसेच काही सदस्य जनावरे खरेदी करतात. नमुद टोळीने यांनी यापुर्वी नागपूर ग्रामीण जिल्हा, आणि चंद्रपुर जिल्हा येथील विवीध पोलीस स्टेशनचे हद्दीत गोवंशाची अवैध रित्या कत्तलीकरीता वाहतुक केल्याचे निष्पन्न झाले. संघटित गुन्हेगार टोळीचा प्रमुख श्रीकांत यादवराव चौधरी याचेविरुध्द नागपुर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन भिवापुर, बेला, कुही, बुट्टीबोरी, तसेच चंद्रपुर जिल्हयात सुध्दा गोवंश जनावराच्या अवैध वाहतुकीबाबत अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद टोळी प्रमुख याला दाखल गुन्हयात अटक करून सुध्दा जामीनावर सुटल्यानंतर पुन्हा वेगवेगळया व नविन साथीदारांसोबत टोळी तयार करून संघटीत रित्या आर्थिक फायदयासाठी **गोवंशाना निर्दयतेने वागणुक देवुन त्यांची कत्तलीकरीता वाहतूक तसेच विक्री करतो. नमुद टोळीतील सदस्यांवर सुध्दा अवैध जनावर वाहतुकीचे अनेक गुन्हे नोंद आहे.** आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण

ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचेवर गुन्हे नोंद करून प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**भिवापुर पोलीसांनी नमुद ५ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.**

लोकशाही वार्ता

# गोतस्कर टोळीवर मोक्का

## भिवापूर पोलिसांची कारवाई

वार्ताहर/भिवापूर

गोवंश तस्करीच्या धंद्यात गुंतून असलेल्या टोळीवर भिवापूर पोलिसांनी मोक्का (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम) अंतर्गत कारवाई केली आहे. पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली.





५ फेब्रुवारी २०२६ रोजी मानोरा शिवारात एक पिकअप वाहन अपघातग्रस्त झाले. वाहनातून आठ गोवंश जनावरे बेकायदेशीरपणे नेली जात असताना हा अपघात झाला. वाहन चालक श्रीकांत चौधरी याने रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाला वाहन धडकवले. यात तीन गोवंश जनावरे ठार झाली तर पाच जखमी झाली.

ठाणेदार निर्मल यांच्या तपासात समोर आले की, ही कारवाई एका सुव्यवस्थित टोळीची होती. टोळीप्रमुख श्रीकांत चौधरी व इतर सदस्य मिळून हा धंदा चालवित होते. चौधरीविरोधात भिवापूर, बेला, कुही, बुटीबोरी तसेच चंद्रपूर जिल्ह्यात गोतस्करीचे गुन्हे दाखल आहेत. भिवापूर पोलिसांनी पाच आरोपींविरुद्ध मोक्का लावण्याचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविला. विशेष पोलिस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र यांनी या प्रस्तावास मंजुरी देत मोक्का लागू करण्याचे आदेश दिले.

March 13, 2026 | Page no: 3 | City
Powerd By ePaperwale | 9702476117

लोकमत

# गोवंश तस्करांच्या टोळीवर मकोका

लोकमत न्यूज नेटवर्क

**भिवापूर :** कायद्याला धाब्यावर बसवून गोवंश तस्करी करणाऱ्या संघटित टोळीवर भिवापूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. मानोरा शिवारात झालेल्या एका भीषण अपघातामुळे या तस्करीचे गुपित उघड झाले असून, मुख्य सूत्रधार चौधरी बंधू आणि त्यांच्या साथीदारांविरुद्ध थेट मकोकाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

५ फेब्रुवारी रोजी एका भरधाव पिकअप वाहनाने झाडाला धडक दिली होती. या अपघातात वाहनातील ८ जनावरांपैकी ३ जण दगावले, तर ५ गंभीर जखमी झाले. चालक श्रीकांत चौधरी व प्रफुल्ल ऊर्फ भोला चौधरी यांच्यावर गुन्हा दाखल करून तपास केला असता, नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात पसरलेले एक मोठे गुन्हेगारी जाळे समोर आले.

**अपघातामुळे तस्करीचे गुपित उघड**

श्रीकांत चौधरी हा या टोळीचा मास्टरमाईंड असून, या टोळीवर विविध पोलिस स्टेशनमध्ये डझनावर गुन्हे दाखल आहेत. वारंवार जामिनावर सुटून पुन्हा तोच धंदा करणाऱ्या या टोळीचा बंदोबस्त करण्यासाठी ठाणेदार जयप्रकाश निर्मल यांनी मकोकाचा प्रस्ताव धाडला होता. विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील यांनी या प्रस्तावाला हिरवा कंदील दिला आहे.

## तीन आरोपींची नावे गोपनीय

या कारवाईत एकूण पाचजणांचा समावेश असून, तीन आरोपींची नावे पोलिसांनी अद्याप गोपनीय ठेवली आहेत.

**मकोकाची चाहूल लागताच एक आरोपी फरार झाला असून, उर्वरित संशयितांचे धाबे दणाणले आहेत. नागपूर जिल्ह्यात गोवंश तस्करीप्रकरणी मकोका लागण्याची ही दुसरीच वेळ असून, या धडाकेबाज कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.**

## अपघातातून तस्करीचे गुपित उघड ● चौधरी बंधूंसह पाच जणांवर पोलिसांची कारवाई

# गोवंश तस्करांच्या टोळीवर मकोका

▶ **भिवापूर, तालुका प्रतिनिधी.** कायद्याला धाब्यावर बसवून गोवंश तस्करी करणाऱ्या संघटित टोळीवर भिवापूर पोलिसांनी मोठी कारवाई करत मकोका (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मानोरा शिवारात झालेल्या भीषण अपघातातून या तस्करीचे गुपित उघड झाले असून, चौधरी बंधूंसह त्यांच्या साथीदारांविरुद्ध ही कारवाई करण्यात आली आहे.

५ फेब्रुवारी रोजी भरधाव पिकअप वाहन झाडाला धडकल्याने गंभीर अपघात झाला होता. या वाहनातून गोवंशाची तस्करी केली जात असल्याचे उघड झाले. वाहनातील आठ जनावरांपैकी तीन जनावरे दगावली, तर पाच गंभीर जखमी झाली. या प्रकरणी चालक श्रीकांत चौधरी व प्रफुल्ल उर्फ भोला चौधरी यांच्यावर गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू करण्यात आला.

तपासादरम्यान नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यात पसरलेल्या मोठ्या तस्करीच्या जाळ्याचा पर्दाफाश झाला. श्रीकांत चौधरी हा या टोळीचा मुख्य सूत्रधार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या टोळीविरुद्ध विविध पोलिस ठाण्यांत डझनभर गुन्हे दाखल असल्याचेही समोर आले.

या प्रकरणात एकूण पाच जणांचा समावेश असून, त्यापैकी तीन आरोपींची नावे पोलिसांनी अद्याप गोपनीय ठेवली आहेत. मकोका लागू होण्याची शक्यता लक्षात येताच एक आरोपी फरार झाला असून उर्वरित संशयितांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वारंवार जामिनावर सुटून पुन्हा तस्करीचा व्यवसाय करणाऱ्या या टोळीचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी भिवापूरचे ठाणेदार जयप्रकाश निर्मल यांनी मकोका लावण्याचा प्रस्ताव पाठविला होता. या प्रस्तावाला विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील यांनी मंजुरी दिली आहे. नागपूर जिल्ह्यात गोवंश तस्करीप्रकरणी मकोका लावण्याची ही दुसरी घटना असल्याने गुन्हेगारी विश्वात मोठी खळबळ उडाली आहे.

## जंगलातील रस्त्यावरून गोवंशांची अवैध वाहतूक उघड



देवलापार, वार्ताहर. देवलापार पोलिस स्टेशन हद्दीतील सालई ते हिवरा बाजार या जंगल रस्त्यावरून गोवंशाची कत्तलीसाठी अवैध वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर शनिवारी रात्री पोलिसांनी कारवाई करून गोवंशासह कार जप्त केली. देवलापार पोलिसांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर ठाणेदार नारायण तुरकुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली रात्री सुमारे साडेनऊ ते साडेदहा वाजेदरम्यान सालई गावाजवळ नाकाबंदी करण्यात आली. त्यावेळी सालईकडून हिवरा बाजारकडे एमएच ०१ एआर ४७३३ क्रमांकाची सिल्वर रंगाची कार येताना दिसली. पोलिसांनी कार थांबवण्याचा प्रयत्न केला असता चालक वाहन सोडून अंधाराचा फायदा घेत फरार झाला. यानंतर पंचासमक्ष वाहनाची तपासणी करण्यात आली असता कारमध्ये दोन गायी व एक गोरा असे एकूण ४५ हजार रुपये किमतीचे तीन गोवंश आढळून आले. तसेच सिल्वर रंगाची कार असा एकूण ३ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ठाणेदार नारायण तुरकुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार राकेश नलगुंडवार, पोलिस हवालदार जीवन देवांगन, पोलिस हवालदार रवींद्र ढोरले, पोलिस शिपाई सचिन येळकर, पोलिस शिपाई केशव फळ आणि खुशाल मंडलेकर यांनी केली.